# 1. केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना

| योजनेचे नांव | **केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना** |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | ज्या योजना आदिवासी विकास किंवा कल्याणाच्या दृष्टीने स्थलकालानुरूप आवश्यक आहेत आणि त्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पात किंवा केंद्रीय निधीतून राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये नाही अशा अभिनव स्वरूपाच्या स्थानिक महत्वाच्या योजना, तांत्रिक औपचारिकतेमुळे दीर्घ कालावधीकरिता अडकून न पडता स्थानिक पातळीवर तातडीने आणि प्रभावीपणे कार्यान्वित करून त्यांचा लाभ गरजू आदिवासींना प्रत्यक्ष मिळवून देणे हा योजनेचा गाभा आहे.<br>केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेचा मूळ उद्देश लक्षात घेऊन खालीलप्रमाणे 3 गट पाडण्यात आले आहेत.<br>अ) उत्पन्न निर्मितीच्या किंवा उत्पन्न वाढीच्या योजना<br>ब) कौशल्य विकास कार्यक्रम/प्रशिक्षणाच्या योजना<br>क) मानव साधन संपत्ती विकासाच्या व आदिवासी कल्याणात्मक योजना<br>वरील गटांतर्गत खालीलप्रमाणे बाबी अंतर्भूत आहेत-<br>**अ) <u>उत्पन्न निर्मितीच्या किंवा उत्पन्न वाढीच्या योजना</u>**<br>➢ सर्वसाधारण: लाभार्थ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शेती वा तत्सम व्यवसायाशी संबंधित योजना उदा. सिंचन, काटेरी तार, ताडपत्री इ.<br>➢ जंगलात वाहणाऱ्या उपनदीवर सिमेंट बंधारा व लघुसिंचन उपसा योजना तसेच शेतमाल व गौण वन उपज प्रक्रिया उद्योगाचा या गटात समावेश राहील.<br>➢ महिला बचत गट, संयुक्त वन व्यवस्थापन समितीद्वारे मोह, डिंक, तेंदू, हिरडा, बेहडा, मध इत्यादींचे संकलन करणे, सुरक्षित साठवणीसाठी गाव पातळीवर गोदाम बांधणे आणि प्रक्रिया करणेचे यंत्र खरेदी करणे.<br>➢ स्वत:च्या शेत जमिनीवर चारा-कुरणे लावणे.<br>➢ बांधावर उत्पन्न देणाऱ्या वृक्षांची लागवड करणे. (बांबू, चिंच, साग, मोह, हिरडा, बेहडा, खैर इत्यादी)<br>➢ कोणत्या भागात कोणत्या व्यवसायास वाव आहे याचा विचार करणेसाठी जिल्हा उद्योग केंद्राचे निरीक्षक व आदिवासी विकास निरीक्षक यांची मदत घेवून सदरची माहिती तयार करून त्याप्रमाणे व्यवसायास सहाय्य करता येते.<br>➢ आदिवासी युवक/युवती/महिला/पुरुष यांचे बचत गट/स्वयंरोजगार संस्था यांना स्वयंरोजगारासाठी योजना प्रस्तावित करता येतात.<br>➢ ज्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पात किंवा केंद्र शासनाच्या निधीतून राबविल्या जाणाऱ्या योजना / नियमित योजनांमध्ये आहे, अशा योजना या गटात घेता येत नाही.<br>**<u>ब) कौशल्य विकास कार्यक्रम/प्रशिक्षणाच्या योजना</u>**<br>➢ **रोजगार/स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण** - आदिवासी उमेदवारांना स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी वा रोजगार/नोकरी मिळविण्यासाठी आवश्यक पात्रता विकसन प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येतात. सदर प्रशिक्षण कार्यक्रम सर्वसाधारणपणे खालील शिर्षाखाली राबविण्यात येतात -<br>1. उत्पादन प्रक्रिया<br>2. टेक्सटाईल्स |

| | |
|---|---|
| | 3. ॲग्रोप्रोसेसिंग<br>4. ऑटोमोबाईल्स<br>5. रिटेल मार्केटिंग<br>6. माहिती तंत्रज्ञान (आय.टी.)<br>7. हॉस्पिटॅलिटी<br>8. मनुष्यबळ विकास<br>9. आरोग्य संवर्धन<br>10. ग्रामसेभेला संयुक्त वन व्यवस्थापन समितीद्वारे सूक्ष्म नियोजनाचे प्रशिक्षण देणे, तसेच स्वयंसेवी संस्थेमार्फत ग्राम विकास, वनसंवर्धन लघु वनउपज संवर्धन, वन व्यवस्थापनाबाबत प्रशिक्षण देणे. गाव पातळीवर सुक्ष्म आराखडा तयार करण्याकरिता तांत्रिक मनुष्यबळ, ग्रामसभा/संयुक्त वन व्यवस्थापन समितीने उपलब्ध करणे.<br>11. रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या योजना देखील या विभागामार्फत न्युक्लिअस बजेट अंतर्गत राबविण्यात येतात.<br><br>➢ **पात्रता विकसन (संभाव्य नोकरी व्यवसायासाठी)** -<br>1. एमएससीआयटी, सीसीसी, टंकलेखन, लघुलेखन, इत्यादी सेवापूर्ती नियमित अर्हतेची पूर्तता करणारे प्रशिक्षण इत्यादी<br>2. उच्च शिक्षणासाठी होणाऱ्या पूर्व परीक्षा प्रशिक्षण<br>3. वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा प्रशिक्षण<br>4. बीएड प्रवेश परीक्षा प्रशिक्षण<br>5. एमबीए व तत्सम पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा<br>6. परदेशात उच्च शिक्षणासाठी प्रवेश परीक्षा<br>7. नेटसेट प्रवेश परीक्षा<br>8. वेळोवेळी शासन निश्चित करेल त्या प्रवेश परीक्षा<br><br>➢ **नोकर भरती स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण** -<br>1. जिल्हा निवड समिती व स्थानिक नोकर भरती स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण<br>2. स्टाफ सिलेक्शन कमिशन स्पर्धा परीक्षा<br>3. रेल्वे रिक्रुटमेंट<br>4. बँकिंग सर्व्हिस रिक्रुटमेंट<br>5. महाराष्ट्र लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा<br>6. केंद्रीय लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा<br><br>**<u>क) मानव साधन संपत्ती विकासाच्या व आदिवासी कल्याणात्मक योजना</u>**<br><br>➢ क्रीडा, कला साहित्य संस्कृती संवर्धन उपक्रम<br>➢ गुणवत्ता व व्यक्तिमत्व विकास, आदिवासींच्या सर्वांगीण विकास, महिला सक्षमीकरण, व्यवस्थापन कौशल्य इत्यादी दृष्टीकोन ठेऊन विकासात्मक उपक्रम<br>➢ क्रीडास्पर्धा आयोजन, आदिवासींच्या पारंपरीक कलाकृतीचे प्रदर्शन, नृत्यकलेचे जतन व संवर्धन उपक्रम, आदिवासी उमेदवारांना राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी पात्रता विकसन प्रशिक्षण, अशा प्रशिक्षणाच्या प्रशिक्षकांचे मानधन, युवा मंडळ/महिला मंडळ यांचे रचनात्मक उपक्रमांना सहाय्य अशा संकल्पनेत येणारे उपक्रम<br>➢ आदिवासी क्षेत्रातील व समाज उत्थानासाठी आवश्यक असलेले उपक्रम. तसेच या क्षेत्राच्या व समाजाच्या समस्यांवर आधारित व्यक्तींचे सामुहिक |

| | |
|---|---|
| | लाभाचे उपक्रम (उदा. घराचे विद्युतीकरण, गवती छपरावर कौले टाकणे, भजनी साहित्य, ग्रामपंचायती सामुहिक कार्यक्रमासाठी भांडी पुरवठा करणे, महिला बचत गटास स्वयंपाकासाठी भांडी पुरविणे, जातीच्या दाखल्यासाठी अर्थसहाय्य इत्यादी)<br>➢ आदिवासींवरील आपात्कालीन किंवा अत्याचार प्रकरणी अपवादात्मक विशेष परिस्थितीत तातडीने सहाय्य देणे |
| **लाभार्थी पात्रता** | **1) शेतकऱ्यांसाठी**<br>• लाभार्थी अनुसूचित जमाती संवर्गातील असावा<br>• विधवा/परित्यक्ता महिला व दारिद्रयरेषेखालील तसेच आदिम जमातीच्या लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल<br>• लाभार्थ्याच्या नावे शेती असल्याचे 7/12 असावा<br>• लाभार्थी हा प्रकल्पातील असावा<br>**2) युवकांसाठी**<br>▪ 1. लाभार्थी अनुसूचित जमाती संवर्गातील असावा<br>▪ 2. विधवा/परित्यक्ता महिला व दारिद्रयरेषेखालील तसेच आदिम जमातीच्या लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल<br>▪ 3. लाभार्थी हा प्रकल्पातील असावा<br>▪ 4. प्रशिक्षणार्थीची शैक्षणिक पात्रता योजनेनूसार राहील<br>**3) महिलांसाठी**<br>1. लाभार्थी अनुसूचित जमाती संवर्गातील असावा<br>2. विधवा/परित्यक्ता महिला व दारिद्रयरेषेखालील तसेच आदिम जमातीच्या लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल<br>3. लाभार्थी हा प्रकल्पातील असावा<br>4. प्रशिक्षणार्थीची शैक्षणिक पात्रता योजनेनूसार असावी<br>**4) वैयक्तिक लाभाच्या योजना**<br>**1. लाभार्थी अनुसूचित जमाती संवर्गातील असावा**<br>**2. विधवा/परित्यक्ता महिला व दारिद्रयरेषेखालील तसेच आदिम जमातीच्या लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल**<br>**3. लाभार्थ्याच्या नावे शेती असल्याचे 7/12 असावा**<br>**4. बेरोजगार असल्याचा करारनामा**<br>**5. गटाची नोंदणी असल्याचा पुरावा**<br>**6. ग्रामसभेचा ठराव**<br>**7. गटातील सदस्य अनुसूचित जमातीचे असावे** |
| **आवश्यक कागदपत्रे** | **अ) उत्पन्न निर्मितीच्या किंवा वाढीच्या योजना**<br>➢ शेती नावे असल्याचा 7/12<br>➢ रहिवासीचे प्रमाणपत्र<br>➢ सन 2002-07 च्या सर्वेनुसार ग्रामसेवक यांचा दारिद्रय रेषेचा दाखला<br>➢ उत्पन्नाचा दाखला<br>➢ रेशन कार्ड ची प्रत<br>➢ पाणी परवाना दाखला<br>➢ अपंग असल्यास अपंग असल्याचा दाखला<br>➢ सदर योजना मिळण्याबाबतचा ग्रामसेभेचा ठराव<br>➢ शाळा सोडल्याचा दाखला/आधार कार्ड/वयाचा दाखला/निवडणूक ओळखपत्र |

| | |
|---|---|
| | **ब) प्रशिक्षणाच्या योजना**<br>➢ प्रशिक्षणार्थ्यांची शैक्षणिक पात्रता योजनेनूसार राहील<br>➢ सन 2002-07 च्या सर्वेनूसार ग्रामसेवक यांचा दारिद्रय रेषेचा दाखला<br>➢ उत्पन्नाचा दाखला<br>➢ रेशन कार्ड ची प्रत<br>➢ अपंग असल्यास अपंग असल्याचा दाखला<br>➢ शाळा सोडल्याचा दाखला/आधार कार्ड/वयाचा दाखला/निवडणूक ओळखपत्र |

## 2. कौशल्य विकास कार्यक्रम

| **योजनेचे नांव** | **कौशल्य विकास कार्यक्रम** |
|---|---|
| **योजनेचे स्वरूप** | उत्पादन व प्रक्रिया, टेक्सटाईल्स, ॲग्रोप्रोसेसिंग, ऑटोमोबाईल्स, रिटेल मार्केटिंग, माहिती तंत्रज्ञान (I.T.), हॉस्पीटॅलिटी, मनुष्यबळ विकास, आरोग्य संवर्धन इ. क्षेत्रांतर्गत येणाऱ्या विविध विषयांचे प्रशिक्षण देणे. शासन ज्ञापन क्र. कौविका 2017/प्र.क्र.133/का.09, दिनांक 6 मार्च, 2018 व मा.आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे पत्र क्र.विकास 2016/प्र.क्र.64/का.3(6), दिनांक 08/03/2019 अन्वये सदर योजना सन 2017-18 पासून मा.आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडे वर्ग करण्यात आली आहे. |
| **लाभार्थी पात्रता** | **अ) रोजगार व स्वयंरोजगारार्थ कौशल्य विकास -**<br>• अल्पशिक्षित बेरोजगार इयत्ता 10 वी व 12 वी नापास, अर्धवट शिक्षण झालेले, शिक्षणातून गळती झालेले आदिवासी विद्यार्थी<br>• रोजगारासाठी स्थलांतर करणारे आदिवासी तरूण<br>• नोकरी गमविलेले आदिवासी तरूण<br>**ब) शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांची विद्यार्थी पात्रता विकासार्थ कौशल्य विकास**<br>• उच्च शिक्षणासाठी प्रवेश परीक्षेस बसू इच्छीणारे आदिवासी विद्यार्थी |

| | |
|---|---|
| | • नोकरी मिळणेस्तव परिक्षा देऊ इच्छीणारे आदिवासी विद्यार्थी<br>**क) लाभार्थी पात्रता-अभ्यासक्रमपरत्वे वेगवेगळी राहू शकते.** |
| **आवश्यक कागदपत्रे** | जातीचे प्रमाणपत्र |
| **लाभार्थी अर्ज** | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय |
| **संपर्काचे पत्ते** | आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे व संबंधित प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, |

## 3. विशेष केंद्रीय साहाय्य योजना

| **योजनेचे नांव** | **विशेष केंद्रीय साहाय्य योजना** |
|---|---|
| **योजनेचे स्वरूप** | सदर योजना ही केंद्रीय साहाय्य योजना असून या अंतर्गत आराखड्यात अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना लाभ मिळणेकरिता नवीनतम व कार्योपयोगी योजनेचा यामध्ये समावेश केला जातो.<br>या योजनेअंतर्गत दरवर्षी नवीन योजना घेण्यात येतात. खालील योजना यापूर्वीच्या वर्षामध्ये मंजूर झालेल्या आहेत.<br>1. फलोत्पादन लागवडीसाठी अर्थसाहाय्य व प्रशिक्षण<br>2. रोपे वाटप<br>3. वॉटरशेड डेव्हलपमेंट<br>4. कंटुर वर औषधी वनस्पतीच्या लागवडीसाठी साहाय्य<br>5. सौरऊर्जेवर आधारित तारेचे कुंपन<br>6. ठिबक सिंचन संच बसविणे |

| | |
|---|---|
| | 7. तुषार सिंचन संच बसविणे<br>8. अनुसूचित जमातीच्या शेतक-यांच्या शेतात ट्यूबवेल बसविणे (खोदकाम, पाईप लाईन, इलेक्ट्रीक मोटार, विद्युतीकरण करणे, मजूरी इ.खर्चासह)<br>9. भाजीपाला बी-बियाणे व अवजारे पुरवठा करणे<br>10. वाहन चालकाचे प्रशिक्षण<br>11. विहिरीत बोअर करणे<br>12. हार्डवेअर, स्वॉफ्टवेअर व डेटा ऑपरेटिंगचे प्रशिक्षण<br>13. किचन गार्डन आणि स्ट्रॉबेरी नर्सरी उभारणे [मित्रा संस्था/महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत (माविम )]<br>14. गांडूळखत निर्मिती<br>15. फ्लोरिकल्चर डेव्हलपमेंट<br>16. हॉर्टिकल्चर नर्सरी डेव्हलपमेंट<br>17. गांडूळखत शेत योजना (प्रशिक्षण व निर्मिती)<br>18. फलोत्पादनासाठी पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम<br>19. किरकोळ जंगल उत्पन्न/जमीनीचे सपाटीकरण<br>20. युवक-युवतींना ऍडव्हान्स डिप्लोमा इन कॉम्प्युटर हार्डवेअर मेंटेनन्स नेटवर्किंग<br>21. वनहक्क संरक्षण कायद्यांतर्गत तथा स्वाभिमान सबळीकरण योजनेंतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थ्यांच्या जमिनीवर नवीन विहीर खोदून विद्युत/तेलपंप/एच.डी.पी.ई./पी.व्ही.सी. पाईप बसवून देणे<br>22. सिंचनासाठी नवीन विहिरींचे खोदकाम व बांधकाम करणे व तेलपंप योजना कार्यान्वित करणे<br>23. मत्स्य व्यवसाय, शेतात शेततळे तयार करणे, फळबाग लागवड करणे<br>24. महिला बचत गटातील अनुसूचित जमातीच्या शेतक-यांच्या शेतात हरितगृह (पॉली हाऊस) उभारणे<br>25. शेती अवजारे/संसाधने, खते व बी-बियाणे, वॉर्डबॉयचे प्रशिक्षण देणे,<br>26. सुरक्षा रक्षकाचे प्रशिक्षण देणे<br>27. संगणक प्रशिक्षण देणे<br>28. ऑटोमोबाईलचे प्रशिक्षण देणे<br>29. कृषिमालावर प्रक्रिया करण्याचे प्रशिक्षण देणे<br>30. वनोपज मालावर प्रक्रिया करण्याचे प्रशिक्षण देणे<br>31. हळद लागवडीसाठी अर्थसाहाय्य<br>32. मोगरा लागवड<br>33. शेडनेटची उभारणी करणे<br>34. कौशल्य विकसित करून स्वयंरोजगारास पात्र करणे<br>35. ऑफिस ऑटोमेशन कोर्सेस प्रशिक्षण<br>36. आचारी कौशल्य विकसित करणे<br>37. बिल्डिंग सुपरवायझर कोर्सेस<br>38. महिला स्वयंसहाय्यता बचत गटांना व्यवसायाकरिता पोल्ट्री फार्म स्थापन करून प्रशिक्षण देणे<br>39. मुख्य वनसंरक्षक, गडचिरोली यांचेमार्फत बांबूपासून हस्तशिल्प आणि वस्तू तयार करणे<br>40. अगरबत्ती तयार करण्यासाठी शेड व बांधकाम करणे<br>41. प्लास्टीक अस्तरीकरणासह शेततळ्याचे बांधकाम करणे<br>42. Establishment of Bamboo Processing Unit at Gadchiroli इत्यादी<br>43. Tube Well + Pumpset<br>44. Biodiversity<br>45. Cage Fishery<br>46. Kitchen Garden for Ashram School<br>47. Supply of Goat units to Woman SHGs (10 Female + 1 Male)<br>48. Pilot Project for promotion of sport (facilities and organizing including) among tribal students in Gadchiroli District.<br>49. Padkai vikas (Bench Terracing)<br>50. Modal Solar Village Project for PvTG Habitations / Padas / Village/ Remote Village<br>51. Establishment of Computer lab and providing competitive examination book in Govt.Hostel |

| | |
|---|---|
| | 52. Pilot Project of Developing solar Ashram School<br>53. Borewell / Dugwell with solar pumps (5HP) for Irrigation of land given under FRA 2006<br>54. Skill Development Training for Youth In 2016-17 WithDrawal<br>55. Establishment of Computer labs & Computer training centers on BOT Basis in Govt. School<br>56. Establishment of libraries in 12 English Medium, 14 EMRSs & 142 Higher Secondary Ashram School<br>57. Providing Drinking water Facilities in Govt.Ashram School & Hostel Facing Drinking water Scarity<br>58. Integreted Agriculture Development Programme for IFR Beneficiaries<br>59. Muradpur Lift Irrigation Project for Tribal Farmer (ITDP Napur)<br>60. Establishment of Moha Processign Unit (Prepration Of Laddu) (Po Gadchiroli) |
| **लाभार्थी पात्रता** | 1. शासन निर्णय व शासनाने निर्गमित करुन दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनूसार अनुसूचित जमाती लाभार्थी असावा<br>2. टिएसपी, ओटीएसपी, माडा, मिनीमाडा या क्षेत्रात असलेली अनुसूचित जमातींच्या गावाअंतर्गत येत असलेले व अनुसूचित जमाती अंतर्गत येत असलेले लाभार्थी<br><br>**आरोग्य विषयक योजना -**<br>1. ज्या गावांमध्य अनुसूचित जमातीचे वास्तव्य मोठया प्रमाणात आहे. ज्या गावात अशी शिबीरे झालेली नाही तसेच कुपोषण व तत्सम दुर्धर आजार उद्‌भवलेले आहेत अशी गावे.<br><br>**रोजगार व उत्पन्न वाढीच्या योजना-**<br>1. लाभार्थी अनुसूचित जामातीचा असवा अपंग व महिला उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल<br>2. लाभार्थीचे कमीत कमी 10 वी पर्यत शिक्षण असावे<br><br>**कृषी व फलोत्पादन योजना-**<br>1. लाभार्थी अनुसूचित जमातीचा असावा. अपंग व महिला उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल<br>2. पात्र व गरजू अनुसूचित जमातीचे शेतकरी व शेतमजूरांना योजनेचा लाभ देण्यात येईल. वन जमीनीचे पट्‌टे मिळालेल्या शेतक-यांना प्राधान्य देण्यात येईल.<br>3. शासन निर्णय व शासनाने वेळोवेळी निर्गमित करुन दिलेल्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे योजनेच्या निकषानूसार आवश्यक कागदपत्रे<br><br>**पिण्याचे पाणी / विहिरीचे बांधकाम / चेक डॅम / सिंचाई योजना -**<br>1. लाभार्थी अनुसूचित जमातीचा असावा<br>2. त्याचे कडे किमान स्वत:ची दीड एकर जमीन असावी. लाभार्थ्याची जमीन लाभक्षेत्रात असल्याबाबत त्याचे नांवे 7/12 उतारा असणे आवश्यक<br>3. लाभार्थ्याच्या स्वत:च्या जमीनीत बोअरवेल नसावी<br><br>**घरकुल-**<br>1. लाभार्थी हा अनुसूचित असावा. त्याची स्वत:ची किंवा शासनाने दिलेली जागा असावी<br>2. लाभार्थ्यास पक्के घर नसावे तसेच शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत अथवा जिल्हा परिषदेमार्फत घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा |
| **आवश्यक कागदपत्रे** | 1) लाभार्थी अनुसूचित जमातीचा असल्याचा आवश्यक पुरावा/ कागदपत्रे<br>2) शासन निर्णय व शासनाने वेळोवेळी निर्गमित करून दिलेल्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे |

| | |
|---|---|
| | योजनेच्या निकषानुसार आवश्यक कागदपत्रे |
| **लाभार्थी अर्ज** | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| **संपर्काचे पत्ते** | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |

## 4. आदिम जमातीचे संरक्षण तथा विकासाच्या योजना

| **योजनेचे नांव** | **आदिम जमातीचे संरक्षण तथा विकासाच्या योजना** |
|---|---|
| **योजनेचे स्वरूप** | सदर योजना ही केंद्रीय सहाय्य योजना असून या अंतर्गत आराखडयाचे अनुषंगाने आदिम जमातीच्या लाभार्थ्यांना लाभ मिळणेकरिता नवीनतम व कार्योपयोगी योजनेचा यामध्ये समावेश केला जातो. तसेच आदिम जामीतीची योजना ही चंद्रपूर, गडचिरोली, अहेरी व भामरागड या प्रकल्प कार्यालयातील माडिया, कोलाम व कातकरी या जमातीकरिता राबविली जातात.<br>या योजनेअंतर्गत दरवर्षी नवीन योजना घेण्यात येतात. खालील योजना यापूर्वीच्या वर्षामध्ये मंजूर झालेल्या आहेत:-<br>1. आरोग्य मार्गदर्शन शिबीर<br>2. अंगणवाड्यांना अतिरिक्त साहाय्य<br>3. वैदु प्रशिक्षण व वैद्यकीय सेवा<br>4. हेल्थ ॲनिमिटर प्रशिक्षण<br>5. घरकुल/आवास<br>6. शाळाबाह्य विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ग सुरू करणे<br>7. आधुनिक तंत्रज्ञानासंबंधित मार्गदर्शन शिबीर<br>8. सांस्कृतिक कार्यक्रम प्रदर्शनासाठी साहाय्य<br>9. हातचलित बोअरवेल, उघडी विहीर बांधणे, नवीन विहीर खोदणे<br>10. भूमिहीनांना जमीन<br>11. औषधी वनस्पतींची लागवड व फलोद्यान<br>12. शेतीसाठी अवजारांचा पुरवठा<br>13. रोप वाटिका<br>14. उपसा सिंचन<br>15. ठिबक व तुषार सिंचन<br>16. मळणी यंत्राचा पुरवठा करणे<br>17. जनावरांचा कृत्रिम रेतन कॅम्प आयोजन, लसीकरण व आरोग्य तपासणी<br>18. दुधाळ जनावरांकरिता गोठा शेड<br>19. बेरोजगारांना आधुनिक संगणक प्रशिक्षण<br>20. वराह पालनासाठी अर्थसाहाय्य<br>21. हॅन्डीक्राफ्ट युनिट स्थापना<br>22. शेळी गट वाटप<br>23. स्थलांतरित पीटीजीकरिता उत्पादन विक्री केंद्र स्थापना<br>24. पाच किलोमिटर लांबीचे जोडरस्ते, छोटे लघुपुल व सिडीवर्क बांधणे<br>25. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम (नालाबंधी शेततळे, वनतळे, जमीन सपाटीकरण, चॅकडॅम बांधणे)<br>26. वायुसौर हायब्रीड ऊर्जा प्रकल्पास 10 टक्के अनुदान<br>27. आदिम जमातीच्या 8 वी ते 10 वीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी आर्थिक सहाय्य देणे इत्यादी |

| | |
|---|---|
| | 28. आरोग्य<br>29. उत्पन्न वाढीच्या योजना<br>30. आरोग्य पोषण व सुरक्षित मातृत्व व सुदृढ बालक<br>31. आरोग्य मित्र प्रशिक्षण<br>32. पुरक आहार<br>33. Supply of baby Warmer to Sub Center (ITDP Bhamragad)<br>34. Providing Bike Ambulances to PHCs (ITDP Bhamragad<br>35. Construction of Labour Rooms at sub Center Level in Remote areas to Pro Construction of Labour Rooms at Sub Center Level in Remote areas to Promote Institutional Deliveries remote Institutional Deliveries (ITDP Bhamragad)<br>36. Provision of equipment's to PVTG SHCs (Bed, Cots, Phototherapy Machine, Water Purifier, Opration Table, Baby Warmer) for Brick Kilns (potegaon, Regadi & Pavimuranda ITDP Gadchiroli)<br>37. MPW Training & Health Camps, Supply of sickle cell kits (Potegaon, Regadi & Pavimuranda ITDP Gadchiroli<br>38. Establishment of mini Hatchery Center Chamorshi (Solar Based) (ITDP Gadchiroli)<br>39. Implementation of Drinking Water Supply Scheme (Solar Based) (ITDP Chandrapur)<br>40. Individual Irrigation Wells for farmers and Providing Pumps, Pipes etc. For 50 Beneficearies From Kolam (ITDP Chandrapur)<br>41. mobile vegetable van & temprary shelter<br>42. Department of anthropology Wardha Material & Child health status of PVTG (Kolam & Madia : 500 Beneficiaries)<br>43. Gramsabha channabodi - sustainable livelivehood generation for forest dwelling ST tribes (PVTG-Madia) by community based forest management, harvesting and processing (220 )(Po Aheri)<br>44. Devrai art Village - training at Bhamragad dist. Gadchiroli.<br>45. Residential Programme for police constable recruitment, armed Forces recruitment<br>46. Community well for Irrigation ( 5 unit @11 Lacs each) (Po Aheri)<br>47. Stiching machine providing to women (Po Aheri)<br>48. Training & Tool Kit Supply to PVTG For Honey Collection (Po Chandrapur)<br>49. Driving skill training programme to PVTGs (Po Gadchiroli)<br>50. Providing mini rice - mill to PVTGs (Po Gadchiroli) |
| **लाभार्थी पात्रता** | 1. शासन निर्णय व शासनाने निर्गमित करुन दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनूसार व कातकरी, माडिया व कोलाम गोंड जमाती लाभार्थी<br>2. टिएसपी, ओटीएसपी, माडा, मिनीमाडा या क्षेत्रात असलेली आदिम जमातींची गावा अंतर्गत येत असलेले व आदिम जमाती अंतर्गत येत असलेले लाभार्थी |

| | |
|---|---|
| | **आरोग्य विषयक योजना -**<br>1. ज्या गावांमध्ये आदिम जमातीचे वास्तव्य मोठया प्रमाणात आहे. ज्या गावात अशी शिबीरे झालेली नाही तसेच कुपोषण व तत्सम दुर्धर आजार उद्भवलेले आहेत अशी गावे.<br><br>**रोजगार व उत्पन्न वाढीच्या योजना-**<br>1. लाभार्थी आदिम जामातीचा असवा अपंग व महिला उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल<br>2. लाभार्थीचे कमीत कमी 10 वी पर्यत शिक्षण असावे<br><br>**कृषी व फलोत्पादन योजना-**<br>1. लाभार्थी आदिम जमातीचा असावा. अपंग व महिला उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल<br>2. पात्र व गरजू आदिम जमातीचे शेतकरी व शेतमजूरांना योजनेचा लाभ देण्यात येईल. वन जमीनीचे पट्टे मिळालेल्या शेतक-यांना प्राधान्य देण्यात येईल.<br>3. शासन निर्णय व शासनाने वेळोवेळी निर्गमित करुन दिलेल्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे योजनेच्या निकषानूसार आवश्यक कागदपत्रे<br><br>**पिण्याचे पाणी / विहिरीचे बांधकाम / चेक डॅम / सिंचाई योजना -**<br>1. लाभार्थी आदिम जमातीचा असावा<br>2. त्याचे कडे किमान स्वत:ची दीड एकर जमीन असावी. लाभार्थ्याची जमीन लाभक्षेत्रात असल्याबाबत त्याचे नांवे 7/12 उतारा असणे आवश्यक<br>3. लाभार्थ्याच्या स्वत:च्या जमीनीत बोअरवेल नसावी<br><br>**घरकुल-**<br>1. लाभार्थी हा कातकरी, कोलाम, माडिया गोंड या आदिम जमातीचा असावा. त्याची स्वत:ची किंवा शासनाने दिलेली जागा असावी<br>2. लाभार्थ्यास पक्के घर नसावे तसेच शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत अथवा जिल्हा परिषदेमार्फत घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा |
| **आवश्यक कागदपत्रे** | 1) लाभार्थी हा कातकरी, कोलाम व माडिया या जमातीचा असल्याचा आवश्यक पुरावा/ कागदपत्रे<br>2) शासन निर्णय व शासनाने वेळोवेळी निर्गमित करून दिलेल्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे योजनेच्या निकषानुसार आवश्यक कागदपत्रे |
| **लाभार्थी अर्ज** | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| **संपर्काचे पत्ते** | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |

## 5. भारतीय संविधानाचे अनुच्छेद 275(1) अंतर्गत योजना

| योजनेचे नांव | भारतीय संविधानाचे अनुच्छेद 275(1) अंतर्गत योजना |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | सदर योजना ही केंद्रीय सहाय्य योजना असून या अंतर्गत आराखड्यात अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांच्या गावे/पाडे/वस्त्या यांना लाभ मिळणेकरिता नवीनतम तसेच सामुहिक हिताकरिता मोठ-मोठी कामे व कार्योपयोगी योजनेचा यामध्ये समावेश केला जातो.<br>या योजनेअंतर्गत दरवर्षी नवीन योजना घेण्यात येतात. खालील योजना यापूर्वीच्या वर्षामध्ये मंजूर झालेल्या आहेत:-<br>1. आदिवासींच्या जमीनींवर फलोत्पादन योजना<br>2. शासकीय आश्रमशाळांना क्रीडांगणाचा विकास करणे व जिमखान्याचे बांधकाम करणे<br>3. घरकुल बांधकाम<br>4. आदिम जमातींचे घरकुल बांधकाम<br>5. आश्रमशाळेतील मुलींचे वसतिगृह<br>6. रेन हार्वेस्टिंग सह शासकीय आश्रमशाळा, लाडगांव, भोरगड, संरक्षण भिंत बांधकाम करणे |

| | |
|---|---|
| | 7. उपसा सिंचन<br>8. बस-स्थानकाची उभारणी करणे Dhanora<br>9. संरक्षण भिंत<br>10. गोंदिया जिल्ह्यात गोंडटोला गुरपार रस्त्याचे बांधकाम<br>11. अर्जुनी मोरगांव येथे बस-स्थानकाची उभारणी<br>12. गोंदिया जिल्ह्यातील एस.टी.बी.टी. ते सलाई टोला-रायपूर-बलमाटोला रोडचे बांधकाम करणे<br>13. वसतिगृह बांधकाम Gondpipri<br>14. शासकीय वसतिगृहामध्ये ग्रंथालय निर्मिती करणे<br>15. कोटजाभोरा, नवेगांव, ता. सालेकसा येथे लहान पुलाचे बांधकाम करणे<br>16. पिपरीया, नवाटोला रस्ता, ता. सालेकसा येथील बांधकाम करणे<br>17. बोदालदंड, भजेपार, ता. सालेकसा येथे मोठ्या पुलाचे बांधकाम करणे<br>18. बोरगांव, गाटाबोडी रस्त्यावर पुलाचे बांधकाम करणे<br>19. आलापल्ली, धानोरा, चिचगड, देवरी, आमगांव या रस्त्यांवर 6 पुलांचे बांधकाम करणे (स्टेट एमडीआर)<br>20. Construction of cement plug/Check damn for recharge of existing Well<br>21. ठक्करबाप्पा धर्तीवर आदिम जमातींच्या खेड्यांमध्ये पाणी, मलनिस्सारण/अंतर्गत रस्ते/समाज मंदिरे इत्यादी कामे करणे<br>22. ट्रॅव्हल आणि टुरिझम<br>23. गोटूल व बहुउद्देशिय सांस्कृतिक केंद्र बांधकाम<br>24. अगरबत्ती प्रकल्प<br>25. पळसपानापासून पत्रावळी तयार करणे<br>26. गोंदिया जिल्ह्यातील तांडा-गोंडीटोला-पोवरीटोला या रस्त्याचे मो-यासह बांधकाम<br>27. कचारगड येथे यात्री निवासाचे बांधकाम करणे<br>28. गायमुख येथे यात्री निवासाचे बांधकाम करणे<br>29. कुवारा भिवसेन येथे यात्री निवासाचे बांधकाम करणे<br>30. मॉ काली देवस्थान कचारगड, ता.सालेकसा, जि.गोंदिया पर्यटन स्थळाचा विकास इत्यादी.<br>31. Integrated Agriculture Development Programme and Allied (Animal Hunsbandary, Fisheries, Dairy Development etc.) activities for IFR and CFR beneficiaries under FRA 2006<br>32. bharat rular livelihoods foundation Improving livelivehood conditionby augmenting land and water resource, sustainable agri practices, enhancing livestock productivity, capacity building of gps for IFR/CFR and convergence of govt= Scheme<br>33. Gadchiroli dist. Sports Complex a complex with gallery for 2000 people 400m running track, multipurpose hall for indoor sports and other vital facilities. Collector Office, Gadchiroli<br>34. Establishment Hand Pounded Rice Unit (Po Gadchiroli)<br>35. Bore Well & Overhead Tank on Solar Energy<br>36. Training to Tribal Student in Paramedical Course |
| **लाभार्थी पात्रता** | 1) महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातींचे गावे/वाडे/पाडे या अंतर्गत यावे.<br>2) शासन निर्णय व शासनाने वेळोवेळी निर्गमित करून दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार |
| **आवश्यक कागदपत्रे** | 1) बांधकाम विषयक बाबींमध्ये संबंधित बांधकाम विभागाची तांत्रिक मान्यता असणे आवश्यक आहे.<br>2) शासन निर्णय व शासनाने वेळोवेळी निर्गमित करून दिलेल्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे योजनेच्या |

| | |
|---|---|
| | निकषानुसार आवश्यक कागदपत्रे |
| **लाभार्थी अर्ज** | **-** |
| **संपर्काचे पत्ते** | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |

## 6. अनुसूचित जमातीच्या सामुहिक विवाह सोहळ्यात सहभागी होणाऱ्या दाम्पत्याकरिता कन्यादान योजना

| | |
|---|---|
| **योजनेचे नांव** | **अनुसूचित जमातीच्या सामुहिक विवाह सोहळ्यात सहभागी होणाऱ्या दाम्पत्याकरिता कन्यादान योजना** |
| **योजनेचे स्वरूप** | लग्न समारंभाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर होणारा खर्च कमी करण्यासाठी आणि विवाह सोहळ्यातील अनुचित प्रथांना आळा घालण्यासाठी सामुहिक विवाह सोहळ्यांना प्रोत्साहन देऊन, अशा विवाह सोहळ्यांमध्ये सहभागी होणाऱ्या दाम्पत्यांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी "कन्यादान योजना" आहे. प्रत्येक विवाह सोहळ्याच्या आयोजनासाठी 10 नवदाम्पत्य असणे आवश्यक राहील. सदर योजनेअंतर्गत सामुहिक विवाह सोहळ्यामध्ये सहभागी होऊन विवाह करणाऱ्या अनुसूचित जमातीच्या जोडप्यांना रु.10,000/-इतके अनुदान धनादेशाद्वारे किंवा पे-ऑर्डरने लग्नाच्या दिवशी दिले जाते. याशिवाय सामुहिक विवाह सोहळ्यात सर्व दाम्पत्यांना विवाह नोंदणी प्रमाणपत्र सुद्धा दिले जाते. |
| **लाभार्थी पात्रता** | 1. नवदाम्पत्यापैकी एकजण म्हणजेच वर किंवा वधू अनुसूचित जमातीचा असणे आवश्यक आहे तसेच वर आणि वधूचे वय विवाहाच्या दिनांकास विवाह नोंदणीच्या नियमानुसार असणे आवश्यक आहे. मात्र वधू व वराचे वय विवाहाच्या दिनांकास 35 वर्षापेक्षा जास्त असू नये. वधू व वराचा प्रथम विवाह असणे आवश्यक आहे तसेच विवाहापूर्वी दोन अपत्य झालेल्या दाम्पत्यास या योजनेचा लाभ मिळण्यासाठी संबंधित जोडप्याने लग्न केले नाही परंतु ते एकत्र राहीले आहेत व त्याला समाजमान्यता आहे असा दाखला योजनेचा लाभ घेणा-या जोडप्याने संबंधित ग्रामपंचायतीकडून घेवून लग्नाच्या सोहळयापूर्वी संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडे सादर करावा व त्यानुसार प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी पात्रता तपासून योजनेचा लाभ पात्र जोडप्यांना देतील.<br>2. शासनाच्या एकापेक्षा जास्त विभागाकडून विवाह अनुदानाचा लाभ घेतला जाऊ नये यासाठी या योजनेंतर्गत लाभ घेणा-या लाभार्थ्यांनी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येणा-या अन्य सामूहिक विवाह अनुदान योजनेचा लाभ घेतलेला नाही अशी जोडपे. |
| **आवश्यक कागदपत्रे** | 1. सक्षम प्राधिकृत अधिकारी यांनी दिलेला वर व वधूचा (अथवा दोन्हींपैकी एक) जातीचा दाखला<br>2. बाल विवाह प्रतिबंध कायदा व हुंडा प्रतिबंध कायद्यांतर्गत असलेल्या कोणत्याही कलमाचा भंग या दाम्पत्य/ कुटुंब यांचेकडून झालेला नसावा याबाबतचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र(Affidavit) सादर करणे आवश्यक आहे. (रु.20 /- च्या स्टँप पेपरवर)<br>3. जन्मतारखेचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रत<br>4. महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याचा पुरावा (Domicile Certificate) |
| **लाभार्थी अर्ज** | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय |
| **संपर्काचे पत्ते** | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय |

## 7. अनुसूचित जमातीच्या युवक/युवतींना पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण देणे

| योजनेचे नांव | अनुसूचित जमातीच्या युवक/युवतींना पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण देणे |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | राज्यातील अनुसूचित जमातीच्या युवकांना राज्य पोलीसदल व लष्कर तथा तत्सम विविध सुरक्षा दलातील अनुशेषांतर्गत संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्यात इगतपूरी, जव्हार, नंदूरबार, राजूरा, आंबेगाव, किनवट, देसाईगंज, धारणी, अकोले या 9 ठिकाणी पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे. शारीरिक व शैक्षणिकदृष्ट्या योग्य असणा-या आदिवासी तरुण/तरुणींना त्यांच्या कुटुंबाची आर्थिक व सामाजिक प्रगती होईल व त्यांचे जीवनमान उंचावे म्हणून सैन्यदल किंवा पोलीस दलात भरती होणेसाठी भरतीपूर्व प्रशिक्षण दिले जाते. आदिवासी प्रशिक्षणार्थींना जेवण, निवास, गणवेश, खेळाचे साहित्य, बुट-मोजे, अंथरूण-पांघरूण इत्यादी सुविधा मोफत पुरविल्या जातात. सैन्य तथा पोलीस दल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रातील एका प्रशिक्षण सत्राचा कालावधी 4 महिन्यांचा असून प्रथम सत्र एप्रिल ते जुलै, द्वितीय सत्र ऑगस्ट ते नोव्हेंबर व तृतीय सत्र डिसेंबर ते मार्च या कालावधीत आयोजित करण्यात येते. एका प्रशिक्षण सत्रात 50 युवक व युवतींना प्रशिक्षण देण्यात येते. |
| लाभार्थी पात्रता | 1. उमेदवार अनुसूचित जमातीचा असावा.<br>2. उमेदवाराचे वय 18 ते जास्तीत जास्त 23 वर्षे असले पाहिजे.<br>3. शैक्षणिक पात्रता - इयत्ता 12 वी पास<br>4. शारीरिक पात्रता-युवकांची उंची 165 सें.मी., छाती 79 से.मी.(न फुगवता) आणि युवती उंची 155 सें.मी., छाती 79 से.मी. (न फुगवता) |
| आवश्यक कागदपत्रे | 1. 10 वी पास गुणपत्रिका<br>2. 12 वी पास गुणपत्रिका<br>3. पदवीधर गुणपत्रिका<br>4. जातीचा दाखला |

| | |
|---|---|
| | 5. शाळा सोडल्याचा दाखला<br>6. अनुभवाचे दाखले (असल्यास)<br>7. फोटो (पासपोर्ट साईज)<br>8. वैद्यकीय अधिका-यांकडून प्रमाणित केलेला शारिरीकदृष्ट्या सक्षम असल्याचा दाखला (Fitness Certificate)<br>9. क्रीडाविषयक माहिती/खेळातील प्राविण्य |
| **लाभार्थी अर्ज** | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय |
| **संपर्काचे पत्ते** | संबंधित केंद्राचे प्रभारी प्रमुख संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय |

## 8. अनुसूचित जमातीच्या युवकांना मोटार वाहन चालक प्रशिक्षण देणे

| **योजनेचे नांव** | **अनुसूचित जमातीच्या युवकांना मोटार वाहन चालक प्रशिक्षण देणे** |
|---|---|
| **योजनेचे स्वरूप** | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील वाहन चालक संदर्भातील रिक्त पदांचा अनुशेष भरून निघावा व पर्यायाने अनुसूचित जमातीच्या युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने राज्यात परिवहन महामंडळ व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने पांढरकवडा, ता.केळापूर, जि.यवतमाळ व ता.वडसा, जि.गडचिरोली व ता.शहादा, जि.नंदूरबार येथे प्रशिक्षण केंद्र सुरू केले आहे. मोटार वाहन चालक प्रशिक्षण सत्राचा कालावधी प्रथम सत्र एप्रिल ते सप्टेंबर व द्वितीय सत्र ऑक्टोबर ते मार्च या कालावधीत प्रशिक्षणार्थींना तांत्रिक, अतांत्रिक चालक विषयक बाबींवर सखोल प्रशिक्षण देण्यात येत, तसेच प्रशिक्षणार्थ्यांनी वाहन चालविण्याचे प्रशिक्षण घेतल्यानंतर त्यांच्याकडून सराव करून घेण्यात येतो.. |
| **लाभार्थी पात्रता** | 1. उमेदवार अनुसूचित जमातीचा असावा.<br>2. उमेदवाराचे वय 23 ते 25 वर्षे<br>3. शैक्षणिक पात्रता - किमान इयत्ता 8 वी उत्तीर्ण असावा.<br>4. शारिरीक पात्रता - युवक उंची 163 सें.मी. असावी.<br>5. उमेदवार शारिरीक व मानसिकदृष्टया वाहनचालकाचे काम करण्यास सक्षम असावा.<br>6. अवजड वाहन चालविण्याचा परवाना व कमीत कमी 2 वर्षांचा अवजड वाहन चालविण्याचा अनुभव |

| | |
|---|---|
| | असावा. |
| **आवश्यक कागदपत्रे** | 1. अर्जदाराचे नजीकच्या काळातील दोन पासपोर्ट साईज फोटो<br>2. दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र 2002-2007<br>3. उत्पन्नाचे प्रमाणपत्र आवश्यक<br>4. रहिवासी दाखला<br>5. शैक्षणिक पात्रता<br>6. शाळा सोडल्याचा दाखला/वयाचा दाखला<br>7. जातीचा दाखला<br>8. शासन वेळोवेळी मागणी करील त्याबाबतचे हमीपत्र |
| **लाभार्थी अर्ज** | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय |
| **संपर्काचे पत्ते** | संबंधित केंद्राचे प्रभारी प्रमुख, संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय |

## 9. गडचिरोली व गोंदिया या नक्षलग्रस्त जिल्हयांतील किशोरवयीन मुला-मुलींच्या उन्नतीसाठी "आपला महाराष्ट्र सुवर्ण जयंती योजना"

| | |
|---|---|
| **योजनेचे नांव** | **गडचिरोली व गोंदिया या नक्षलग्रस्त जिल्हयांतील किशोरवयीन मुला-मुलींच्या उन्नतीसाठी "आपला महाराष्ट्र सुवर्ण जयंती योजना"** |

| | |
|---|---|
| **योजनेचे स्वरूप** | गडचिरोली व गोंदिया या नक्षल प्रभावित जिल्ह्यातील किशोरवयीन मुला-मुलींच्या उन्नतीसाठी व राज्यातील इतर भागातील रूढी, परंपरा, संस्कृती, शिक्षण व शेती इत्यादीचे दर्शन घडविण्यासाठी "आपला महाराष्ट्र सुवर्ण जयंती योजना" राबविण्यात येते. यात सहभागी मुले-मुली नक्षलप्रभावित क्षेत्रांमध्ये बदल घडवतील व सर्वांगीण विकासाकडे अग्रेसर होतील असा उद्‌देश ठेवून गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यातील नक्षल प्रभावित भागातील एकूण 40 मुला-मुलींचा 1 गट व अधिका-यांचा समावेश असलेले पथक याप्रमाणे एका वर्षात 10 गटांना महाराष्ट्र दर्शन घडविण्यात येते. |
| **लाभार्थी पात्रता** | गडचिरोली व गोंदिया या नक्षलग्रस्त भागातील शालेय विद्‌यार्थी |
| **आवश्यक कागदपत्रे** | - |
| **लाभार्थी अर्ज** | - |
| **संपर्काचे पत्ते** | संबंधित एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |

## 10. भूमिहिन दारिद्रय रेषेखालील आदिवासींचे सबळीकरण व स्वाभिमान योजना

| योजनेचे नांव | **भूमिहिन दारिद्रय रेषेखालील आदिवासींचे सबळीकरण व स्वाभिमान योजना** |
|---|---|
| **योजनेचे स्वरूप** | दारिद्रय रेषेखालील भूमिहिन कुटुंबांना त्यांचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढावे व त्यांच्या राहणीमानात बदल व्हावा, याकरिता त्यांचे मजुरीवर असलेले अवलंबित्व कमी करणेस्तव त्यांना कायम स्वरूपी उत्पन्नाचे साधन उपलब्ध होणे आवश्यक आहे. याकरिता या विभागामार्फत दारिद्रय रेषेखालील आदिवासी भूमिहीन कुटुंबांना उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध व्हावे, म्हणून त्यांना कसण्याकरिता जमीन उपलब्ध केली जाते. त्यासाठी आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय क्र.भूवाये-2003/प्र.क्र.142/का.9, दि.24 फेब्रुवारी, 2004 नुसार 50% अनुदान व 50% कर्ज या स्वरूपात निधी उपलब्ध करून देण्यात येतो. लाभार्थी कुटुंबाला देण्यात येणारे कर्ज हे बिनव्याजी व 10 वर्षे मुदतीकरिता असेल. तथापि, कर्जफेडीची सुरुवात कर्ज मंजुरीनंतर 2 वर्षानंतर सुरू करण्यात येईल. |
| **लाभार्थी पात्रता** | 1. दि.1.1.2000 या दिनांकास भूमिहीन असणारा आदिवासी लाभ घेण्यास पात्र समजण्यात येईल.<br>2. जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखालील समितीकडून जमीन खरेदी केली जाईल व तिचे वाटप करून भूमिहिन आदिवासी कुटुंबातील पती-पत्नीच्या नावे केले जाईल. मात्र विधवा व परित्यक्त्या स्त्रियांच्या बाबतीत जमीन त्यांच्या नावे केली जाईल.<br>3. प्रत्येक भूमिहीन कुटुंबाला 4 एकर कोरडवाहू जमीन किंवा 2 एकर ओलिताखालील जमीन उपलब्ध करून दिली जाईल.<br>4. लाभार्थ्यांना उपलब्ध करून द्यावयाच्या जमिनीकरिता अदा करण्यात येणाऱ्या रकमेपैकी 50% रक्कम बिनव्याजी कर्ज व 50% रक्कम अनुदान या स्वरूपात असेल. यापैकी कर्जाचा भाग हा राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली या केंद्र शासनांतर्गत कार्य करणाऱ्या संस्थेकडून उपलब्ध करून घेण्यात येईल.<br>5. लाभार्थ्यांचे किमान वय 25 वर्षे व कमाल वय 60 वर्षे इतके राहील.<br>6. निवडण्यात येणारा लाभार्थी हा दारिद्रय रेषेखालील भूमिहीन शेतमजूर असावा.<br>7. या योजनेकरिता निवडावयाच्या लाभार्थ्यांमध्ये खालील घटकांना प्राधान्य देण्यात यावे<br>अ) आदिम जमाती (कातकरी, कोलाम व माडिया)<br>ब) परित्यक्ता स्त्रिया<br>क) विधवा स्त्रिया<br>8. महसूल व वन विभागाने गायरान व अतिरिक्त जमिनीचे वाटप केले आहे त्या कुटुंबांना लाभ मिळणार नाही.<br>9. ज्या आदिवासी व्यक्तीच्या विरुद्ध जमिनीच्या अतिक्रमणाबाबतची प्रकरणे अतिक्रमण अधिनियमांतर्गत महसूल अधिकाऱ्यांकडे प्रलंबित आहेत त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. |
| **आवश्यक कागदपत्रे** | ➢ अर्जदाराचे नजिकच्या काळातील दोन पासपोर्टसाईज फोटो<br>➢ दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र<br>➢ रहिवासी प्रमाणपत्र |

| | |
|---|---|
| | ➢ जातीचे प्रमाणपत्र<br>➢ भूमिहीन असल्याबाबतचा दाखला<br>➢ शाळा सोडल्याचा दाखला/वयाचा दाखला |
| **लाभार्थी अर्ज** | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय |
| **संपर्काचे पत्ते** | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय |

## 11.अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी शबरी आदिवासी घरकुल योजना

| | |
|---|---|
| **योजनेचे नांव** | **अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी शबरी आदिवासी घरकुल योजना** |
| **योजनेचे स्वरूप** | आदिवासी उपयोजनेंतर्गत आदिवासी क्षेत्रात येणाऱ्या जिल्ह्यांतील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी तसेच आदिवासी बाह्य क्षेत्रात येणाऱ्या जिल्ह्यांतील अनुसूचित जमातीच्या पात्र लाभार्थ्यांना घराचे 269.00 चौ.फु. चटई क्षेत्र असलेले पक्के घरकुल उपलब्ध करून देणे. |
| **लाभार्थी पात्रता** | 1. लाभार्थी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमाती संवर्गातील असावा.<br>2. लाभार्थ्यांचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य किमान 15 वर्षांचे असावे.<br>3. लाभार्थ्यांकडे स्वत:ची किंवा शासनाने दिलेली जमीन असणे आवश्यक राहील.<br>4. लाभार्थ्यांकडे स्वत:चे किंवा कुटुंबियांचे पक्के घर नसावे.<br>5. विधवा, परित्यक्ता, निराधार, दुर्गम भागातील लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल.<br>7. अर्जदाराच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा खालीलप्रमाणे :-<br>अ) ग्रामीण क्षेत्र - रु. 1.20 लाख<br>ब) नगरपरिषद क्षेत्र - रु. 3.00 लाख<br>क) महानगरपालिका क्षेत्र - रु. 3.00 लाख |
| घराची किंमत मर्यादा | घराच्या बांधकामासाठी क्षेत्रनिहाय कमाल खर्चाची मर्यादा पुढील प्रमाणे आहे.<br>अ) ग्रामीण साधारण क्षेत्र : रु. 1.32 लाख<br>ब) नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रासाठी : रु. 1.42 लाख<br>क) नगरपरिषद क्षेत्र : रु. 2.50 लाख<br>ड) महानगरपालिका क्षेत्र : रु. 2.50 लाख |
| **आवश्यक कागदपत्रे** | 1. अर्जदाराचे नजिकच्या काळातील दोन पासपोर्टसाईज फोटो<br>2. जातीचे प्रमाणपत्र<br>3. रहिवासी प्रमाणपत्र<br>4. 7/12 उतारा व नमुना 8-अ<br>5. शाळा सोडल्याचा दाखला/वयाचा दाखला<br>6. जागा उपलब्धतेचे प्रमाणपत्र<br>7. तहसिलदार यांचेकडून प्रमाणित उत्पन्नाचा दाखला<br>8. शासन वेळोवेळी विहित करतील अशी कागदपत्रे<br>9. ग्रामसभेचा ठराव |

| | |
|---|---|
| **लाभार्थी अर्ज** | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| **संपर्काचे पत्ते** | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |

## 12.पारधी समाजाच्या लाभार्थ्यांना घरकुल बांधून देणे

| **योजनेचे नांव** | **पारधी समाजाच्या लाभार्थ्यांना घरकुल बांधून देणे** |
|---|---|
| **योजनेचे स्वरूप** | ज्या आदिवासी पारधी व्यक्तीकडे राहण्यास स्वत:चे पक्के घर नाही अशा लाभार्थ्यांना पक्की घरे बांधून देऊन, त्यांच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणणे. |
| **लाभार्थी पात्रता** | 1. ज्या पारधी लाभार्थ्यांकडे स्वत:ची जागा अथवा कच्चे घरे आहे अशा लाभार्थ्यांस योजनेचा लाभ देता येईल.<br>2. इतर कोणत्याही योजनेतून घरकुलाचा लाभ त्या कुटुंबास पूर्वी देण्यात आलेला नसावा.<br>3. आदिवासी पारधी समाजातील विधवा, निराधार व परित्यक्त्या स्त्रियांना प्राधान्याने लाभ देण्यात येईल. |
| **आवश्यक कागदपत्रे** | 1. अर्जदाराचे नजिकच्या काळातील दोन पासपोर्टसाईज फोटो<br>2. जातीचे प्रमाणपत्र<br>3. रहिवासी प्रमाणपत्र<br>4. 7/12 उतारा व नमुना 8-अ<br>5. शाळा सोडल्याचा दाखला/वयाचा दाखला<br>6. जागा उपलब्धतेचे प्रमाणपत्र<br>7. तहसिलदार यांचेकडून प्रमाणित उत्पन्नाचा दाखला<br>8. शासन वेळोवेळी विहित करतील अशी कागदपत्रे<br>9. ग्रामसभेचा ठराव |
| **लाभार्थी अर्ज** | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |

| | |
|---|---|
| **संपर्काचे पत्ते** | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |

## 13. श्रेणी-3 व 4 ची बालके रुग्णालयात उपचार घेत असतांना रुग्णाला व त्यांच्या पालकास आहार व बुडित मजुरीपोटी मजुरी देणेबाबत योजना

| | |
|---|---|
| **योजनेचे नांव** | **श्रेणी-3 व 4 ची बालके रुग्णालयात उपचार घेत असतांना रुग्णाला व त्यांच्या पालकास आहार व बुडित मजुरीपोटी मजुरी देणेबाबत योजना** |
| **योजनेचे स्वरूप** | आदिवासी क्षेत्रातील अतिसंवेदनशील व संवेदनशील कुपोषण प्रवण अशा 15 जिल्हयांमधील म्हणजे ठाणे, रायगड, नंदुरबार, धुळे, नाशिक, अहमदनगर, पुणे, अमरावती, जळगाव, यवतमाळ, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, नागपूर व नांदेड हया जिल्हयामधील आदिवासी तालुक्यामध्ये श्रेणी 3 व 4 ची बालके रुग्णालयात उपचार घेत असतांना रुग्णाला व त्यांच्या पालकास आहारापोटी दोन वेळच्या जेवणासाठी रु. |
| **लाभार्थी पात्रता** | लाभार्थी हा अनुसूचित जमातीचा असावा. |
| **आवश्यक कागदपत्रे** | अनुसूचित जमातीचा असल्याबाबत आवश्यक कागदपत्रे |
| **लाभार्थी अर्ज** | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| **संपर्काचे पत्ते** | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |

## 14. ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रम

| | |
|---|---|
| **योजनेचे नांव** | **ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रम** |
| **योजनेचे स्वरूप** | राज्यातील ग्रामीण /नागरी भागातील अनुसूचित आदिवासी क्षेत्र, अतिरिक्त आदिवासी क्षेत्र,माडा/मिनीमाडा क्षेत्र प्रस्तावित माडा/मिनी माडाक्षेत्र तसेच आदिवासी उपयोजना बाहय क्षेत्रातील 50 टक्केपेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या असलेल्या वस्त्या/पाडे/ वाडया/ गावांच्या/महानगरपालिका, नगरपरिषदेचे प्रभाग येथील विकासासाठी आवश्यक असलेल्या सामूहिक विकासाच्या सुविधा पुरविण्यासाठी सदर योजना राबविण्यात येते.<br>दि. 6 मार्च 2017 च्या शासन निर्णयान्वये ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा विस्तारीत कार्यक्रम योजनांतर्गत कामांना प्रशासकीय मंजूरी देण्यांचे अधिकार सदस्य सचिव म्हणून संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना आहेत.<br>या अंतर्गत खालील प्रमाणे सामुहिक विकासाच्या सुविधा अंतर्भूत आहेत.<br>1. मुख्य वस्तीपर्यत जोडरस्ते, सिमेंट कांक्रिट/डांबरीकरणाचे अंतर्गत रस्ते, शाळेचे कंपाऊंड<br>2. पिण्याच्या शुध्द पाण्याची सोय करणे, फिल्टर प्लँट उभारणे, पाणी पुरवठा योजना करणे, बोअर<br>करणे, हातपंप बसविणे, सबमर्सिबल पंप बसविणे, सार्वजनिक हाळ/हौद बांधणे. |

| | |
|---|---|
| | 3. जुन्या विहीरीची दुरुस्ती, विहिरीचे खोलीकरण, गाळ काढणे, बोअरची दुरुस्ती, विंधन विहीरी पाईप<br>वाढविणे.<br>4. बंद गटार बांधणे, नाल्या-मो-या बांधणे.<br>5. आदिवासी वस्तीचे विद्युतीकरण, मार्ग दिप बसविणे, अपारंपरिक ऊर्जाव्दारे मार्ग दिप बसविणे.<br>6. समाज मंदिर बांधणे, मंगल कार्यालय, वाचनालय, व्यायामशाळा स्थापना<br>(प्राधान्याने संकुल उभारणे)<br>7. सार्वजनिक शौचकुप व मुताऱ्याचे बांधकाम.<br>8. स्मशानभूमी बांधकाम<br>9. नदीकाठची संरक्षण भिंत व घाट बांधणे.<br>10. तिर्थक्षेत्र व पर्यटन विकास.<br>11. ग्रामपंचायत कार्यालय / ग्राम सचिवालय<br>ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा अंतर्गत घ्यावयाच्या कामांची वितीय मर्यादा पुढील प्रमाणे आहे.<br>• 1000 पेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या -रु.20.00 लक्ष<br>• 500 ते 999 आदिवासी लोकसंख्या - रु.12.50 लक्ष<br>• 499 पेक्षा कमी आदिवासी लोकसंख्या- रु.7.50 लक्ष<br>या योजनेअंतर्गतएका वर्षात जास्तीत जास्त दोन कामे घेता येतील व एका गावासाठी दोन्ही कामांसाठी सदर मर्यादा रु.31.25 लक्ष इतकी आहे. |
| **लाभार्थी पात्रता** | आदिवासी क्षेत्र, अतिरिक्त आदिवासी क्षेत्र, माडा/मिनीमाडा क्षेत्र, प्रस्तावित माडा/मिनीमाडा क्षेत्र तसेच आदिवासी उपयोजना बाहय क्षेत्रातील 50 टक्केपेक्षा जास्त आदिवासींची लोकसंख्या असलेल्या वस्त्या/पाडे/ वाड्या/गावाच्या/ महानगरपालिका, नगरपरिषदेचे प्रभाग |
| **आवश्यक कागदपत्रे** | 1. प्रकल्प अहवाल<br>2. ग्रामपंचायत ठराव<br>3. लोकसंख्या प्रमाणपत्र<br>4. स्थळदर्शक नकाशा |
| **लाभार्थी अर्ज** | संबंधित प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र. यांचे कार्यालय |
| **संपर्काचे पत्ते** | संबंधित प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र. यांचे कार्यालय |

## 15. आदिवासी भागामध्ये सांस्कृतिक संकुल बांधणे

| | |
|---|---|
| **योजनेचे नांव** | **आदिवासी भागामध्ये सांस्कृतिक संकुल बांधणे.** |
| **योजनेचे स्वरूप** | आदिवासी लोकांच्या उपजत सांस्कृतिक, सामाजिक कलागुणांना चालना देणे, आदिवासी समाजातील लोककला, सामूहिक लग्न, परंपरागत सण-उत्सवांना चालना देण्याच्या |

| | |
|---|---|
| | दृष्टीने राज्यातील आदिवासी सांस्कृतिक संकुल बांधकामास आदिवासी उपयोजनेतून अनुदान उपलब्ध करुन देतांना प्रथम प्राधान्य हे अनुसूचित क्षेत्र त्यानंतर अतिरीक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र, आदिवासी उपयोजना बाहेरील क्षेत्रापैकी माडा व मिनी माडा असा प्राथम्यक्रम ठरविण्यात येत आहे. सदर प्राथम्यक्रमानुसार पहिल्या क्षेत्रातील सांस्कृतिक संकुलाचे प्रस्ताव मंजूर झाल्याशिवाय पुढील क्षेत्राचे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच उक्त क्षेत्रामध्ये येणा-या तालुक्यामध्ये जास्तीत जास्त दोन सांस्कृतिक संकुल मंजूर करण्यात येतील. |
| **लाभार्थी पात्रता** | 1. एका तालुक्यामध्ये जास्तीत जास्त दोन सांस्कृतिक संकुल मंजूर करण्यात येतील.<br>2. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेमार्फत शिफारस करण्यात येईल.<br>3. बांधकामाकरिता जागा ही संबंधित ग्रामपंचायत/नगरपालिका/महानगरपालिका यांनी विनामूल्य उपलब्ध करून द्यावी.<br>4. कमीत कमी 437 चौ.मी. बांधकामाचे क्षेत्रफळ असावे. संकुलामध्ये सांस्कृतिक सभागृह, शौचालय/स्नानगृह, अतिथीगृह, प्रशिक्षणकक्ष इ. बाबी प्रामुख्याने असाव्यात.<br>5. आदिवासींकरिता सांस्कृतिक संकुल बांधण्यासाठी रु.1.00 कोटी इतकी कमाल मर्यादा आहे. |
| **आवश्यक कागदपत्रे** | 1. ग्रामपंचायत/नगरपालिका/महानगरपालिका यांचा ठराव.<br>2. जागेचा मूळ 7/12 उतारा.<br>3. जागेचा मोजणी नकाशा.<br>4. आदिवासीची लोकसंख्या, किती गांवाना/लोकसंख्येला योजनेचा लाभ होणार आहे याबाबत तपशिल.<br>5. एका तालुक्यात दोन सांस्कृतिक संकुल मंजूर करण्याची तरतूद आहे याबाबत प्रमाणपत्र.<br>6. सदर जमिनी व अतिक्रमण अथवा न्यायालयात दावा दाखल नसल्याबाबत दाखला.<br>7. प्रस्तावासोबत प्रकल्प अधिकारी यांचे शिफारसपत्र असणे आवश्यक.<br>8. अंदाजपत्रकावर प्रकल्प अधिकारी यांची स्वाक्षरी व शिक्का/अपर आयुक्त ह्यांचे शिफारस पत्र.<br>9. संकुलाचा वापर हा त्या परिसरातील आदिवासी लोकांना लोककला सांस्कृतिक, विवाह समारंभ कार्यक्रमांना व इतर कलागुणांना चालना देण्याच्या दृष्टीने करण्यात येईल असे ग्रामपंचायत/नगरपालिका यांचे प्रमाणपत्र.<br>10. अंदाजपत्रक व आराखड्यास संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सक्षम अधिका-यांची तांत्रिक मान्यता असणे आवश्यक. |
| **लाभार्थी अर्ज** | संबंधित प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र. यांचे कार्यालय |
| **संपर्काचे पत्ते** | संबंधित प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र. यांचे कार्यालय |

## 16. नक्षलग्रस्त भागात नक्षलवाद्यांना गावबंदी केलेल्या गावांना प्रोत्साहनात्मक अनुदान मंजूर करणे

| | |
|---|---|
| **योजनेचे नांव** | नक्षलग्रस्त भागात नक्षलवाद्यांना गावबंदी केलेल्या गावांना प्रोत्साहनात्मक अनुदान मंजूर करणे |
| **योजनेचे स्वरूप** | गडचिरोली व गोंदिया जिल्हयातील नक्षलग्रस्त भागातील काही गावातील ग्रामस्थांनी उत्स्फुर्त पुढाकाराने नक्षलवाद्यांविरुद्ध धाडस दाखवून नक्षलवाद्यांना गावबंदी केलेली आहे. अशा गावांच्या विकासासाठी प्रोत्साहनपर अनुदान देण्याची योजना सुरु करण्यात आली. यामध्ये छोट्या स्वरुपाचे रस्ते, शाळांच्या इमारती, पाणी पुरवठा योजना, विहिरी खणणे, अंगणवाडी खोलीचे बांधकाम व दुरुस्ती, पिण्याच्या पाण्यासाठी पाईपलाईन टाकणे, पाणवठा तयार करणे, बोडीचे बांधकाम व दुरुस्ती, व्यायामशाळा इ. स्वरुपात कामे घेण्यात येतील. सदरची योजना ही आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक 13/03/2007 नुसार राबविण्यात येते. |
| **लाभार्थी पात्रता** | गृह विभागाकडून वेळोवेळी जो काही भाग नक्षलग्रस्त म्हणून घोषित केला जाईल अशा भागात नक्षलवाद्यांना गावबंदी केलेली गावे |
| **आवश्यक कागदपत्रे** | 1. गावाच्या ग्रामपंचायतींचा ठराव आणि ग्रामसभेचा ठराव आवश्यक राहील.<br>2. पोलीस अधिक्षकांकडील अहवाल जिल्हाधिका-यांच्या शिफारशीसह आवश्यक राहील. |
| **लाभार्थी अर्ज** | - |
| **संपर्काचे पत्ते** | संबंधित पोलीस अधिक्षक, संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय |

**17. अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळ चौरस आहार देण्यासाठीची योजना**

**<u>"भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार"</u>**

| | |
|---|---|
| योजनेचे नांव | अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळ चौरस आहार देण्यासाठीची योजना "भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार" |

| | |
|---|---|
| **योजनेचे स्वरुप** | अनुसूचित क्षेत्रातील कुपोषण, बालमृत्यू व कमी वजनाची बालके जन्माला येणे यांसारख्या गंभीर समस्यांवर मात करण्यासाठी राज्यशासनाच्या वतीने उपाययोजना म्हणून **"भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार"** योजना सुरु करण्यात आली आहे.<br><br>अनुसूचित क्षेत्रातील स्त्रियांच्या आहारातील उष्मांक (Calories) प्रथिनांच्या कमतरतेमुळे कमी वजनाची बालके जन्माला येण्याचे प्रमाण जास्त असून आदिवासी समाजामध्ये याचे प्रमाण 33.1 % एवढे आहे. आदिवासी स्त्रियांमध्ये गरोदरपणाच्या शेवटच्या तीमाहीमध्ये वजनवाढीचे प्रमाण कमी असल्यामुळे त्याचा परिणाम बाळाच्या वजनावर होऊन कमी वजनाची बालके जन्माला येतात, तसेच बालक जन्मानंतर प्रथम 3 महिने पूर्णपणे मातेवर अवलंबून असल्यामुळे या कालावधीत स्तनदा मातेस 3 महिने याप्रमाणे ताजा चौरस आहार देणे अधिक उपयुक्त ठरणार आहे. अनुसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एकवेळचा चौरस आहार देण्याच्या योजनेस आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दि.18/11/2015 च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. या योजनेनुसार राज्यातील 16 आदिवासी जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्र व अतिरीक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील साधारणत: 13,593 अंगणवाड्यांमध्ये ही योजना राबविण्यात येत आहे. अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रियांना शेवटच्या तीमाहीत व स्तनदा मातांना बाळंतपणानंतर पहिल्या तीमाहीत याप्रमाणे 6 महिन्यांच्या कालावधीकरिता एकवेळचा चौरस आहार देण्यात येत आहे. प्रती लाभार्थी प्रतिदिन आहाराचा सरासरी खर्च रु.25/- एवढा असून अनुसूचित क्षेत्रातील अंगणवाडी अंतर्गत साधारणत: एकूण 85 हजार एवढ्या गरोदर स्त्रिया व स्तनदा माता या योजनेचा लाभ घेत आहेत.<br>त्याचप्रमाणे अनुसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील 7 महिने ते 6 वर्षे वयोगटाच्या सर्व बालकांना अंडी/केळी/ऋतुमानानुसार फळे इत्यादींचा अतिरिक्त आहार पुरविणेबाबत (टप्पा-2) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दि.05/8/2016 च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार<br>अनुसूचित क्षेत्रातील आदिवसी उपयोजना क्षेत्रात असलेल्या अंगणवाड्यांतर्गत 7 महिने ते 6 वर्ष वयोगटातील सर्व बालकांना प्रतीदिन शाकाहारी मुलांना 2 केळी व मांसाहारी मुलांना 1 उकडलेले अंडे आठवड्यातून 4 वेळा म्हणजेच महिन्यातून 16 दिवस एकवेळचा अतिरिक्त आहार देण्यास मान्यता देण्यात आली आहे.<br>या योजनेअंतर्गत मांसाहारी मुलांना कोंबडीचे एक उकडलेले अंडे व शाकाहारी मुलांना दोन केळी याप्रमाणे प्रती लाभार्थी रु.5/- या कमाल मर्यादेत खर्च अनुज्ञेय राहील. अंडी उकडून देण्याची जबाबदारी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची राहील. |
| **लाभार्थी पात्रता** | अंगणवाडी/मिनी अंगणवाडी क्षेत्रातील नोंदणी झालेली प्रत्येक गरोदर स्त्री व स्तनदा माता. |
| **आवश्यक कागदपत्रे** | अंगणवाडी/मिनी अंगणवाडी केंद्रामध्ये नोंदणी झालेली प्रत्येक गरोदर स्त्री व स्तनदा माता यांची पडताळणी संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रात झालेल्या नोंदणीनुसार करण्यात यावी.<br>या योजनेच्या टप्पा-2 अंतर्गत 7 महिने ते 6 वर्षे वयोगटातील सर्व लाभार्थी बालकांची नोंद अंगणवाडी सेविकेने स्वतंत्र नोंदवही करून नियमितपणे नोंद करावी. |
| **लाभार्थी अर्ज** | - |
| **संपर्काचे पत्ते** | • अनुसूचित क्षेत्रातील संबंधितअंगणवाडी/मिनी अंगणवाडी<br>• उपमुख्य कार्यकारी अधिकारी, बाल कल्याण, जिल्हा परिषद<br>• संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास प्रकल्प |